# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रसिद्धी पत्रक

- **दिल्लीच्या राष्ट्रीय प्रदर्शनात मिरा भाईंदरच्या महिलांची वर्णी**
- **दोन महिला बचत गटांच्या विशेष उत्पादनांची झाली निवड**

मिरा भाईंदर मधील दोन महिला बचत गटांना राष्ट्रपती भवनातील प्रदर्शनात आपली उत्पादने सादर करण्याची संधी मिळाली आहे. गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाच्या उद्योगिनी योजनेअंतर्गत ही निवड करण्यात आली आहे. हे प्रदर्शन ८ ते १६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत सुरू राहणार आहे.

महिला बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना व्यापक संधी देण्यासाठी गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाने उद्योगिनी योजने अंतर्गत संपूर्ण देशभरातून महिला बचत गटांकडील उत्पादनांची माहिती मागवली होती. मिरा भाईंदर मधील महिला बचत गटांनी ३०० पेक्षा अधिक उत्पादनांनी या योजनेअंतर्गत नोंदणी केली होती. त्यापैकी श्री महालक्ष्मी महिला बचत गट आणि ब्राईट रेस या दोन बचत गटांची राष्ट्रीय स्तरावरील या प्रदर्शनासाठी करण्यात आली आहे. राष्ट्रपती भवनात सुरू असलेल्या प्रदर्शनात या बचत गटातील महिलांना आपली उत्पादने सादर करता येणार आहे. श्री महालक्ष्मी महिला बचत गटामार्फत इमिटेशन ज्वेलरी बनविण्यात येते. त्यांच्या दागिन्यांमधील वेगळेपण आणि गुणवत्तेमुळे या राष्ट्रीय प्रदर्शनात निवड झाली आहे. तर ब्राईट रेस या महिला बचत गटाद्वारे करण्यात येणाऱ्या वारली चित्रांची निवडही प्रदर्शनासाठी करण्यात आली आहे. निवड करण्यात आलेल्या दोन महिला बचत गटांना प्रदर्शनात सहभागी होण्याची व्यवस्था महापालिकेच्या वतीन करण्यात आली आहे.

मिरा भाईंदर शहरात १ हजार २०० बचत गट कार्यरत आहेत. महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर (भा.प्र.से) यांच्या मार्गदर्शनाखाली महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी या बचत गटांना विशेष सहकार्य करण्यात येत आहे. सध्या या योजनेच्या माध्यमातून स्थानिक महिला उद्योजकांना राष्ट्रीय स्तरावर संधी मिळाली असून, याचा उपयोग महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी महत्त्वाचे ठरणार आहे, असे वक्तव्य आयुक्तांनी केले.